१२/२/२००२

३




वार्षिक पारितोषक वितरण प्रसंगी बोलताना प्र-कुलगुरु चव्हाण, सोबत प्रा. डॉ. पाटील, कार्यकारी अध्यक्ष रा. कृ. कणबरकर, प्रा. कोळेकर, प्रा. सौ. सुनिता काळे आदी.

# शिक्षणाद्वारेच स्वावलंबनाचे संस्कार– प्र. कुलगुरु चव्हाण

कोल्हापूर / प्रतिनिधी ■

'व्यक्तिमत्त्व विकास हा शिक्षणाचा मुख्य हेतू असला तरी समाजात जगण्यासाठी आवश्यक असणारे स्वावलंबनाचे संस्कार करण्याचे काम शिक्षणच करत असते' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरु डॉ. व्ही. एम. चव्हाण यांनी कमला कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष रा.कृ. कणबरकर होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. प्रा. सौ. एस. एन. काळे यांनी अहवाल वाचन केले. सूत्र संचालन प्रा. सौ. व्ही. व्ही. मैदरगी व प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले तर आभार डॉ. सौ. बी. व्ही. शेळके यांनी मानले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर, उतमराव काळे, चंद्रकांत पाटगांवकर, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.